**प्रेसनोट** दि. 20/02/2026

**अ‍ॅन्टी करप्शन ब्युरोकडून पौड पोलीस स्टेशनच्या सहा.फौजदार यांचेवर लाच मागणी करून स्विकारले प्रकरणी कारवाई केलेबाबत.**

| **लाचलुचपत प्रतिबंधक विभाग/घटक** | **पुणे** |
|---|---|
| **पोलीस स्टेशन व गुन्हा नोंद क्रमांक** | पौड पोलीस स्टेशन, पुणे ग्रामीण |
| **कलम** | भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम, सन 1988 चे कलम 7 |
| **तक्रारदार** | पुरूष, वय 45 वर्ष |
| **आरोपी लोकसेवकाचे नाव व कार्यालय** | श्री सचिन बाळासाहेब शिंदे, वय- 45 वर्ष, पद- सहा.पोलिस फौजदार नेम. पौड पोलीस ठाणे, पुणे ग्रामीण (वर्ग 3), सध्याचा पत्ता - ग्रीन फ्लोरेन्सइया सोसायटी फ्लॅट नंबर 409, सुसगाव, ता. मुळशी जि.पुणे, **(वर्ग - 3)** |
| **सुरवातीस मागणी केलेली लाचेची रक्कम** | **रू. 1,00,000/- (एक लाख रूपये)** |
| **पडताळणी दरम्यान लाच मागणी** | **रू. 1,00,000/- तडजोडी अंती रू. 35,000/- (पस्तीस हजार रूपये)** |
| **पडताळणी दिनांक** | दि. 20/02/2026 |
| **ठिकाण** | पौड पोलीस ठाणे अंकित मुळशी बीट ऑफिस, पुणे ग्रामीण येथे |
| **सापळा अधिकारी यांचे नाव व पद** | श्री प्रशांत चौगुले, पोलीस उपअधीक्षक, ला.प्र.वि., सोलापूर (मो.क्र. 9823225465) |
| **तपास अधिकारी यांचे नाव व पद** | श्रीमती शैलजा शिंदे, पोलीस निरीक्षक, ला.प्र.वि, पुणे (मो.क्र. 7722011255) |

**थोडक्यात माहिती :-** यातील तक्रारदार यांचे विरूद्ध पौड पोलीस ठाणे, पुणे ग्रामीण येथे दाखल असलेल्या गुन्ह्याचा तपास सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक (ASI) सचिन शिंदे हे करत असून सदर गुन्ह्यात गाडी जप्त न करण्यासाठी आणि तपासात मदत करण्यासाठी तक्रारदार यांना नमुद लोकसवक यांनी 1,00,000/- रूपयाची लाचेची मागणी केली असल्याची तक्रार दि. 18/02/2026 रोजी तक्रारदार यांनी दिली होती.

तक्रारदार यांचे तक्रारीचे अनुषंगाने दि. 20/02/2026 रोजी पडताळणी केली असता सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक (ASI) सचिन शिंदे यांनी तक्रारदार यांचे विरूद्ध पौड पोलीस ठाणे, पुणे ग्रामीण येथे दाखल असलेल्या गुन्ह्यात गाडी जप्त न करण्यासाठी आणि तपासात मदत करण्यासाठी तक्रारदार यांना 1,00,000/- रू. ची मागणी करून तडजोडअंती पौड पोलीस ठाणे (पुणे ग्रामीण) येथे 35,000/- रूपये लाचेची मागणी केली.

ला.प्र.वि. पथकाकडून आज दिनांक 20/02/2026 रोजी 17.40 वा. करण्यात आलेल्या सापळा कारवाईदरम्यान आलोसे ए एस आय सचिन शिंदे यांनी तक्रारदाराकडून 35,000/- रूपयाची लाच पौड पोलीस ठाणे अंकित मुळशी बीट ऑफिस, पुणे ग्रामीण येथे पंचासमक्ष स्वीकारली असता त्यांना रंगेहाथ पकडण्यात आले आहे.

वरील आरोपी लोकसेवक यांना ताब्यात घेऊन त्यांच्याविरूद्ध पौड पोलीस ठाणे, पुणे ग्रामीण येथे भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम 1988 चे कलम 7 नुसार गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू आहे.

**सदरची कारवाई पोलीस उप आयुक्त/पोलीस अधीक्षक श्री.शिरीष सरदेशपांडे, ला.प्र.वि. पुणे परिक्षेत्र, पुणे व अपर पोलीस अधीक्षक श्री. अजीत पाटील, ला.प्र.वि. पुणे, अपर पोलीस अधीक्षक श्री. अर्जुन भोसले, ला.प्र.वि. पुणे, यांचे मार्गदर्शनाखाली सोलापूर लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने केली. लोकसेवक शासकीय अधिकारी / कर्मचारी किंवा त्यांच्यावतीने खाजगी इसम (एजंट) हे कोणतेही शासकीय काम करून देण्यासाठी कायदेशीर फी व्यतिरिक्त अन्य लाचेची मागणी करीत असल्यास त्याबाबत तात्काळ लाचलुचपत प्रतिबंधक विभाग पुणे कार्यालयास खालील क्रमांकवर सपंर्क साधण्याचे आवाहन श्री. शिरीष सरदेशपांडे, पोलीस अधीक्षक, ला.प्र.वि. पुणे (मो.क्र. 9823167154) तसेच अपर पोलीस अधीक्षक-1 श्री. अजीत पाटील, ला.प्र.वि.,पुणे (मो.क्र. 9029030530) यांनी केले आहे.**

1) **अ‍ॅन्टी करप्शन ब्युरो, पुणे- दुरध्वनी क्रमांक** -020-26122134, 26132802, 26050423, 9403781064
2) **व्हॉट्स-ॲप क्रमांक - 9403781064 (पुणे),** 9930997700 **(मुंबई)**
3) **ई-मेलआयडी - पुणे** dyspacbpune@mahapolice.gov.in
4) **वेबसाईट -** https://acb.maharashtra.gov.in
5) **ऑनलाईन तक्रार करणेसाठी** – https://acb.maharashtra.gov.in/bribe-compliant



दयानंद गावडे
सहा.पोलीस आयुक्त / पो. उप अधीक्षक
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, पुणे.